नि.दिवाणी दावा क्र.५४/२०१६
भागिरथीबाई वि.मंचक व इतर
वादीतर्फे सा.क्र.१ (नि.क्र.६८)

<u>वादीतर्फे पुढील सरतपासत श्री.के.व्ही. बेडकुळे वकिल यांच्यामार्फत सुरु.</u>

**१०.** वादी माझी आई आहे. तिने मला दावा चालविण्यासाठी अधिकारपत्र दिले आहे. नि.क्र.६० हे अधिकारपत्र तेच आहे. त्यावर तिचा अंगठा व माझी सही आहे. तसेच, दोन साक्षीदारांच्या सहया आहेत. त्यातील मजकुर बरोबर आहे. आता मला दि.०२/०१/२०१६ रोजीचा नि.क्र.७०/१ चा अर्ज दाखवला. त्यावर माझ्या आईचा अंगठा आहे. स.क्र.२६१/३/४ मौजे किनगांव येथील जमिनीचा कोणीही खरेदीदस्त करु नये अशा मजकुराचा तो अर्ज होता. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर दुय्यम निबंधक श्रेणी-१, अहमदपूर यांची पोहच असलेली सही व शिक्का आहे. त्यास **<u>नि.क्र.७१</u>** देण्यात येते. त्यासोबत स.क्र.२६१/१ चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. सदर संपुर्ण जमिनींपैकी ४ हेक्टर ३५ आर जमीन अकृषीक आहे. त्यामध्ये नमूद नावे प्लॉटींगच्या खरेदीदारांची आहेत. याकामी नि.क्र.७०/३ लगत वाद मिळकतीचे लाईट बील दाखल केले आहे. (सदरचे लाईट बील प्रतिवादींनी निशाणी देण्यास हरकत उपस्थित केल्याने वाचण्याच्या सोईसाठी त्यास **<u>नि.क्र.७२</u>** देण्यात येते.) नि.क्र.७६/४ लगत दैनिक एकमत वर्तमानपत्राचा दि.१०/१२/२०१६ रोजीच्या अंकाची जाहीर प्रगटनाची नोटीस दाखल केली आहे. त्यामध्ये दाव्याचा क्रमांक ०३/२०१६ आहे. त्यावर आमच्या वकिलांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.७३</u>** देण्यात येते.

**<u>प्रतिवादींच्या उलटतपासासाठी तहकुब करण्यात आला.</u>**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष

स्वाक्षरीत/-
**( एस.एन.सरडे )**

**दिनांक:२४/११/२०२५.** **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.**